N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

**1. District (जिल्हा):** जळगाव **P.S.(ठाणे):** धरणगांव **Year (वर्ष):** 2022

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0027 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 24/01/2022 23:24 बजे

**2.**

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

**3. (a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार
   **Time Period (कालावधी):** पहर 5
   **Date From (दिनांक पासून):** 24/01/2022
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 24/01/2022
   **Time From (वेळेपासून):** 15:00 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 15:43 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 24/01/2022 **Time (वेळ):** 22:49 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**
**Entry No. (नोंद क्र.):** 029 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 24/01/2022 22:49 बजे

**4. Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

**5. Place of Occurrence (घटनास्थळ):**

**1.(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पश्चिम, 1 किमी
**Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** धरणगाव ,धरणगाव

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):** धरणगांव
**District(State) (जिल्हा(राज्य)):** जळगाव(महाराष्ट्र)

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** प्रशात भगवान सुर्यवंशी

**(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1977 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
**ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पाळधी खु,धरणगाव ,धरणगांव ,जळगाव,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | पाळधी खु,धरणगाव ,धरणगांव ,जळगाव,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अशोक दामु बिन्हाडे | | | 1. राधाकष्ण नगर एलआयसी कॉल, अमळनेर,अमळनेर ,धरणगांव ,जळगाव, महाराष्ट्र,भारत |
| 2 | तुळशीराम भगवान सैंदाणे | | | 1. प्लॉट न 4 बोरोळे नगर जवळ पंड,चोपडे ,चोपडा ,धरणगांव ,जळगाव,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

यावेळी मा.पोलीस निरीक्षक शंकर शेळके सो यांचे आदेशान्वये आम्ही पो.ठा.अ.पो.ना.3153 दिपक पाटील खालीलप्रमाणे गुन्हा रजी.दाखल करीत आहोत.1)धरणगांव पो.स्टे. गुरनं. 0027/2022 भ्रष्टाचार प्रतिबंधक (सुधारीत) कायदा सन 1988 चे कलम 7 प्रमाणे2) फिर्यादीचे नाव प्रशांत भगवान सुर्यवंशी वय 45 व्यवसाय नोकरी रा. पाळधी खु// साई मंदीराजवळ पाळधी खु//ता.धरणगांव, जि. जळगांव3) आरोपीचे नाव 1) अशोक दामु बिन्हाडे वय 56 व्यवसाय नोकरी प्रभारी गट शिक्षणधिकारी पंचायत समीती धरणगाव रा. प्लॉट न.30 राधाकृष्ण नगर एल.आय.सी कॉलनी जवळ पिपळे रोड अमळनेर ता.अमळनेर जि.जळगाव (जिल्हा परिषद वर्ग -2),2) तुळशीराम भगवान सैंदाणे वय 34 व्यवसाय कंत्राटी कर्मचारी समाविशीत शिक्षण तज्ञ, गट साधन केंद्र, पंचायत समीती धरणगाव रा. प्लॉट न. 4 बोरोळे नगर जवळ पंडीत कॉलनी मुकबधीर शाळे जवळ चोपडा ता.चोपडा जि.जळगाव 4) अप.घ.ता.वेळ व ठि - दि.24.01.2022 रोजी 15.43 वा. गटशिक्षणधिकारी कार्यालय धरणगाव येथे 5) लाचेची मागणी - 2000/- रु.6) हस्तगत लाचेची रक्कम - 2000/-रु. (त्यात व 500/- रू.दराच्या 04चलनी नोटा अ.पा. लावलेल्या7) गुन्हयाची थोडक्यात हकीगत :- यातील तक्रारदार यांचे धरणगाव येथे स्वता.चे मालकीची नोबत इंटरनॅशनल शाळा आहे.सदर शाळेत 1 ली ते 7 वी पर्यत वर्ग चालतात सन 2016 पासुन ते आज पावेतो नमुद शाळा ही स्वयम अर्थसहायता या त्तवावर चालते शासनाच्या RTE (Right to Education)योजने प्रमाणे 25 टक्के विद्यार्थी हे शाळेत भरवायाचे असतात त्यासाठी शासन प्रत्येक विद्यार्थ्या मागे 8,000/- रु वार्षीक अनुदान मंजुर करते.फिर्यादी यांनी सदर शाळेचे वर नमुद अनुदान मंजुर होणे साठीचा प्रस्ताव गट शिक्षणाधिकारी धरणगाव यांचे मार्फतीने पाठविण्यासाठी त्याचे कार्यालयात सादर केला होता आलोसे क्र.1 यानी सदर प्रकरणा मध्ये काही त्रुट्या असल्याचे सांगुन सदर त्रुट्यांची पुर्तता करुन त्याचा अनुकूल अहवाल पाठविण्याच्या मोबदल्यात फिर्यादी कडे 2,000/- रु लाचेची मागणी केली त्यासाठी फिर्यादी यांनी दि.30.12.2021 रोजी ला.प्र.वि.जळगाव कार्यालया कडे लेखी तक्रार दिली होती सदर तक्रारीची दि. 30.12.2021 रोजी ला.प्र.वि जळगाव पथकाने पंचसाक्षीदारा समक्ष पळताळणी केली असता यातील आलोसे क्र. 1 यांनी तक्रार यांचे RTE (Right to Education) योजने प्रमाणे शाळेवर नमुद वर नमुद अनुदान मंजुरीसाठीच्या प्रस्तावावर अनुकुल अहवाल पाठविण्याच्या मोबदल्यात तक्रारदार यांचे कडे पंचासमक्ष 2,000/- रु ची लाचेची मागणी केली त्या नंतर दि. 24.01.2022 रोजी सदर लाचेची रक्कम आलोसे क्र. 1 याचे सागणे वरुन आरोपी क्र. 2 यांनी वर नमुद वेळी व ठिकाणी तक्रारदार यांचे कडुन पंचासमक्ष स्विकारले म्हणुन गुन्हा वगैरे मजकुरचे तक्रार वरुन गुन्हा

रजीस्टरी दाखल करीत आहोत.व सदर गुन्ह्याचा खबरी रिपोर्ट मा.कोर्टात पाठवीत आहोत.व सदर गुन्ह्याचा स्पेशल रिपोर्ट वरीष्ठांना इमेलद्वारे पाठवीत आहोत.सदर गुन्ह्याचा पुढील तपास श्री. एस. के. बच्छाव, पोलीस निरीक्षक, अन्टी करप्शन ब्यूरो, जळगांव हे करीत आहेत.व सदर गुन्ह्याची टंकलिखीत फिर्याद जोडली आहे

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

**(1) Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** Shankar Vitthal Shelke(I (Inspector)) / POBN69961 **or (किंवा)**

**(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):**

**No.(क्र.):** **to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

**(4) Transferred to P.S.(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

**14.Signature/Thumb impression of the complainant / informant.(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

P.B. Suryawanshi.

**15.Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची**

पोलीस ठाणे अंमलदार धरणगाव पो.स्टे.

**Name (नाव):** Shankar Vitthal Shelke

**Rank(पद):** I (Inspector)

**No.(सं.):** POBN69961

फिर्याद

धरणगांव पोलीस स्टेशन, जि.जळगाव

दिनांक २४.०१.२०२२

**मी प्रशांत भगवान सुर्यवंशी, वय ४५, व्यवसाय नोकरी, रा.पाळधी खु।। साई मंदीराजवळ पाळधी ता.धरणगांव जि.जळगांव**

समक्ष हजर राहुन फिर्याद देतो की, मी वरील ठिकाणी माझे कुंटूबियांसह राहतो. दि.३०.१२.२०२१ रोजी मी जळगांव ॲन्टी करप्शन ब्युरो,कार्यालयाचे पोनि.एस.के.बच्छाव साहेब यांचेशी संपर्क साधुन धरणगांव येथील एका लोकसेवकाविरुध्द लाचे सबंधी तक्रार असल्याचे कळविले होते. मी सदर दिवशी सकाळी १०.०० वा. धरणगांव रेल्वे स्टेशन जवळील मोकळया जागेत भेटणार असल्याचे कळविले होते.

त्याप्रमाणे दि.३०.१२.२०२१ रोजी सकाळी १०.०० वा.मी धरणगांव रेल्वे स्टेशन जवळ माझे मोटार सायकलसह हजर असतांना एका स्कार्पीओ वाहनात ॲन्टी करप्शन ब्युरोचे पो.नि.एस.के.बच्छाव हे दोन शासकिय पंच व सापळा पथकासह आले. त्यानंतर मी माझी तक्रार दोन पंचासमक्ष माझे स्वत:चे हस्ताक्षरात लिहुन दिली ती खालील प्रमाणे आहे.

पाळधी ता. धरणगांव येथे माझे स्वत:चे मालकीची नोबल इंटरनॅशनल शाळा आहे. माझी पत्नी सौ.अर्चना प्रशांत सुर्यवंशी ही सदर शाळेची अध्यक्ष व मी सचिव आहे. सदर शाळेत १ली ते ७ वी पर्यत वर्ग चालविले जातात. सन २०१६ पासुन आजपावेतो नमुद शाळा ही स्वयं अर्थ सहायता या तत्वावर आम्ही चालवित आहोत. शासनाच्या RTE (Right to Education) योजने प्रमाणे २५% विद्यार्थी हे शाळेत भरावयाचे असतात. त्यासाठी राज्य शासन प्रत्येक विद्यार्थ्यामागे ८,०००/– रू.वार्षीक अनुदान मंजुर करीत असते. सन २०२०–२०२१ या शैक्षणिक वर्षात RTE योजने अंतर्गत आमच्या शाळेत १७ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला असुन ८,०००/– रूपये प्रमाणे १७ विद्यार्थ्यांचे १,३६,०००/– रू.प्रतीपुर्ती अनुदान रक्कम झाली आहे. आमच्या शाळेचे वर नमुद अनुदान मंजुर होण्यासाठीचा प्रस्ताव विहीत नमुण्यात तयार करून गट शिक्षणाधिकारी, धरणगांव यांच्या कार्यालयात सादर केला होता. त्यांनतर मी सुमारे २० ते २५ दिवसांपुर्वी सदर प्रस्ताव मंजुर झाला किंवा नाही याबाबत विचारपुस करण्यासाठी धरणगांवचे गटशिक्षणाधिकारी श्री.अशोक बि–हाडे यांना त्यांच्या कार्यालयात जावुन भेटलो. तेव्हा त्यांनी मला सदर प्रकरणामध्ये काही त्रुटया असल्याचे सांगितले. व सदर त्रुटयांची पुर्तता करून प्रकरण माझे कडे घेवुन या असे सांगुन तुमचा प्रस्ताव हा १,३६,०००/–रूपयांचा असुन तुम्हाला त्याचा लागलीच अनुकुल अहवाल तयार करून पाठवुन देतो त्यासाठी तुम्ही मला २०००/–रू.आणुन द्या असे सांगितले. श्री.अशोक बि–हाडे हे आमच्या शाळेची प्रतीपुर्ती अनुदान मंजुर होण्यासाठीचे प्रस्तावावर अनुकुल अहवाल सादर करण्याच्या मोबदल्यात माझेंकडेस २,०००/– रू.लाचेची मागणी करीत असल्याचे माझे लक्षात आले. तेव्हा मी त्यांना प्रस्तावातील त्रुटयांची पुर्तता करून व पैशांची व्यवस्था करून तुम्हाला भेटतो असे सांगुन निघुन आलो आहे. तरी त्यांचेवर योग्य ती कारवाई करावी बाबत नमुद आहे.

त्यानंतर बच्छाव साहेब यांनी मला व पंच क्रं.१ अशांना थोडक्यात सुचना दिल्या. त्यानंतर बच्छाव साहेब यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर मध्ये नविन मेमरी कार्ड टाकुन ते सुरु करुन माझे व दोन्ही पंचाचे वक्तव्य ध्वनीमुद्रीत केले. त्यानंतर बच्छाव साहेब यांनी सदरचे डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन ते माझे गळयात लटकवुन दिले. त्यानंतर मला पंच कं.१ यांचेसह गट शिक्षणाधिकारी अशोक बि–हाडे यांची भेट घेण्यासाठी गट शिक्षणाधिकारी कार्यालय, धरणगांव येथे माझे मोटार सायकलसह पाठविले होते. तेव्हा मी पंच कं १ यांचेसह गट शिक्षणाधिकारी कार्यालय,धरणगांव येथे गेलो. सदर ठिकाणी गट शिक्षणाधिकारी अशोक बि–हाडे यांचेशी माझी भेट झाली. तेव्हा त्यांनी मला तुम्ही तीन वाजता या, साडेतीनला या असे सांगितले त्यानंतर मी व पंच क्र.०१ असे सापळा पथका जवळ परत आलो होतो.

त्यानंतर गट शिक्षणाधिकारी अशोक बि–हाडे यांनी मला साडेतीन वाजता पुन्हा बोलविले असल्याने बच्छाव साहेब यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर मधील मेमरी कार्ड मध्ये नवीन फाईल तयार करुन ते माझे गळयात लटकवुन दिले. त्यानंतर मला पंच कं.१ यांचेसह गट शिक्षणाधिकारी अशोक बि–हाडे यांची भेट घेण्यासाठी गट शिक्षणाधिकारी कार्यालय, धरणगांव येथे माझे मोटार सायकलसह पाठविले होते. त्यानंतर गट शिक्षणाधिकारी अशोक बि–हाडे यांच्याशी माझी भेट झाली. त्यानंतर गट शिक्षणाधिकारी अशोक बि–हाडे व माझेत माझे शाळेच्या अनुदानाविषयी चर्चा झाली. तेव्हा गट शिक्षणाधिकारी अशोक बि–हाडे यांनी मला उजव्या हाताचे दोन बोटे दाखवुन दोन हजार रुपये असे इशा–याने सांगितले व पैसे आणले आहे का नाही, असे विचारले तेव्हा मी त्यांना माझ्या मिसेस कडे पैसे आहेत, असे सांगितले. तेव्हा मी त्यांना पुढे कसं करायच ते सांगा, असे विचारले असता त्यांनी मला पुन्हा उजव्या हाताचे दोन बोटे दाखवुन दोन हजार रुपये असे इशा–याने सांगितले व तोंडाने आणले आहे का ? असे विचारुन माझेकडे २०००/–रु. लाच मागणी केली. तेव्हा मी त्यांना दहा/पंधरा मिनिटात येतो असे सांगुन सापळा पथकाजवळ परत आलो होतो.

तेव्हा वेळ कमी असल्याने बच्छाव साहेब यांनी पुढील सापळा कार्यवाही सलगपणे एकत्रितरित्या करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर मी गट शिक्षणाधिकारी अशोक बि–हाडे यांना देण्यासाठी माझे घर खर्चामधुन आणलेली

धरणगांव पोस्टे भाग-5 गुरन CCTNS नं 27/2022 भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 कलम-7 प्रमाणे दि.24.1.2022 22.49 वाजता नोंद घेण्यात आली आहे

(सही)

पोलीस ठाणे अमलदार धरणगांव पो.स्टे.

(सही)

एस.के.बच्छाव
PI.ACB जळगांव

P.B.Suryawanshi

२,०००/–रू. रक्कम (त्यात ५००/–रू.दराच्या ०४ नोटा) बच्छाव साहेब यांचे समक्ष हजर केले. सदर नोटांना अ. पावडर लावुन सदरच्या नोटा माझे शर्टाच्या पुढील डाव्या बाजुच्या खिश्यात अलगद ठेवुन दिल्या होत्या.

त्यानंतर बच्छाव साहेब यांनी मला व पंच क्रं.१ अशांना पुन्हा थोडक्यात सुचना दिल्या. त्यानंतर बच्छाव साहेब यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये पुन्हा नविन मेमरी कार्ड टाकुन माझेकडेस डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर देवुन मला पंच क्रं. १ यांचेसह गट शिक्षणाधिकारी यांना लाच रक्कम देण्यासाठी गट शिक्षणाधिकारी कार्यालय, धरणगांव येथे पाठविले होते. परंतु माझी गट शिक्षणाधिकारी अशोक बि–हाडे यांच्याशी भेट झाली नाही.म्हणुन मी त्यांना माझे मोबाईल फोनवरुन फोन केला.परंतु त्यांनी फोन रिसीव्ह केला नाही. त्यानंतर लागलीच त्यांचा मला फोन आला. तेव्हा त्यांनी मी तुमची वाट पाहीली, शेवटी मला दवाखान्यात काम निघालं, म्हणुन मी दवाखान्यात आलो आहे, असे सांगितले.त्यानंतर मी सापळा पथकाजवळ परत आलो होतो.त्यानंतर माझे सांगणे नुसार बच्छाव यांनी पुढील सापळा कार्यवाही दि.३१.१२.२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता करण्याचा निर्णय घेतला.

मी दि.३१.१२.२०२१ रोजी सकाळी धरणगांव रेल्वे स्टेशन जवळ माझे मोटार सायकलसह हजर असतांना बच्छाव साहेब हे सापळा पथकासह आले. त्यानंतर बच्छाव साहेब यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नविन मेमरी कार्ड टाकुन माझेकडेस डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर देवुन मला पंच क्रं.१ यांचेसह गट शिक्षणाधिकारी यांना लाच रक्कम देण्यासाठी गट शिक्षणाधिकारी कार्यालय, धरणगांव येथे पाठविले होते.परंतु माझी गट शिक्षणाधिकारी अशोक बि–हाडे यांच्याशी भेट झाली नाही.म्हणुन मी त्यांना माझे मोबाईल फोनवरुन फोन केला. तेव्हा त्यांनी मला तुमची वाट पाहीली, आमच्या मागे कामं राहतात असे सांगितले.त्यानंतर मी सापळा पथकाजवळ परत आलो होतो.त्यानंतर माझे सांगणे नुसार बच्छाव यांनी पुढील सापळा कार्यवाही दि.०३.०१.२०२२ रोजी करण्याचा निर्णय घेतला.

मी दि.०३.०१.२०२२ रोजी सकाळी धरणगांव रेल्वे स्टेशन जवळ माझे मोटार सायकलसह हजर असतांना बच्छाव साहेब हे सापळा पथकासह आले. त्यानंतर बच्छाव साहेब यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नविन मेमरी कार्ड टाकुन माझेकडेस डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर देवुन मला पंच क्रं.१ यांचेसह गट शिक्षणाधिकारी अशोक बि–हाडे यांना लाच रक्कम देण्यासाठी गट शिक्षणाधिकारी कार्यालय, धरणगांव येथे पाठविले होते. परंतु माझी गट शिक्षणाधिकारी अशोक बि–हाडे यांच्याशी भेट झाली नाही.म्हणुन मी त्यांना माझे मोबाईल फोनवरुन फोन केला. तेव्हा त्यांनी मला तुम्ही तायडे यांना भेटा असे सांगितल्याने मी तायडे यांची भेट घेतली होती.तेव्हा तायडे हे माझेशी इतर कामांविषयी बोलले परंतु माझे शाळेच्या अनुदानाचे कामाविषयी बोलले नाहीत.त्यामुळे मी सापळा पथकाजवळ परत आलो होतो.

त्यानंतर मी अधुन मधुन गट शिक्षणाधिकारी अशोक बि–हाडे हे कार्यालयात आले किंवा कसे? याबाबत माहीती घेतली असता ते कार्यालयात आले नसल्याचे समजले. त्यानंतर दि.२४.०१.२०२२ रोजी गट शिक्षणाधिकारी अशोक बि–हाडे हे कार्यालयात येणार असल्याचे समजले सदरची बाब मी बच्छाव साहेब यांना कळविली.

त्यानंतर मी बच्छाव साहेब यांना कळविल्यानुसार दि.२४.०१.२०२२ रोजी सकाळी धरणगांव रेल्वे स्टेशन जवळ माझे मोटार सायकलसह हजर होतो. तेव्हा बच्छाव साहेब हे सापळा पथकासह आले.त्यानंतर बच्छाव साहेब यांचे सुचनेनुसार मी गट शिक्षणाधिकारी अशोक बि–हाडे यांना फोन केला होता. तेव्हा त्यांनी मला तुम्ही ऑफिसला जावुन सैंदाणे यांना भेटा असे सांगितले होते. त्यानंतर बच्छाव साहेब यांनी माझेकडेस डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर देवुन मला व पंच क्रं.१ अशांना लाचेच्या रकमेसह गट शिक्षणाधिकारी कार्यालय, धरणगांव येथे सैंदाणे व गट शिक्षणाधिकारी अशोक बि–हाडे यांची भेट घेण्यासाठी पाठविले होते. तेव्हा मी व पंच क्रं.१ असे प्रथम गट शिक्षणाधिकारी कार्यालयात RTE चे कामकाज करणारे कर्मचारी सैंदाणे यांना भेटलो. त्यानंतर काही वेळाने गट शिक्षणाधिकारी अशोक बि–हाडे हे सदर ठिकाणी आले. त्यानंतर मी गट शिक्षणाधिकारी अशोक बि–हाडे यांना ठरल्याप्रमाणे लाचेची रक्कम देवु केली असता त्यांनी थांबा थोडे, सैंदाणे यांना भेटुन घ्या, असे सांगितले. त्यानंतर गट शिक्षणाधिकारी अशोक बि–हाडे, सैंदाणे व माझेत माझे शाळेच्या कामकाजा विषयी चर्चा झाली. त्यानंतर गट शिक्षणाधिकारी अशोक बि–हाडे हे मिटींगला निघुन गेले. त्यानंतर सैंदाणे यांनी मला एक फाईल देवुन त्याची झेरॉक्स करुन आणण्यास सांगितले त्याप्रमाणे मी कागदपत्रांचे झेरॉक्स काढुन आणले. तेव्हा सैंदाणे यांनी त्यांचे हातातील एका गुलाबी रंगाची फाईल उघडुन लाचेची रक्कम सदर फाईलमध्ये ठेवण्यास मला इशा–याने सांगितले. त्याप्रमाणे मी माझेजवळील लाचेची रक्कम २०००/–रुपये (त्यात ५००/– रुपये दराच्या ०४ नोटा) माझे उजव्या हाताने शर्टच्या पुढील डाव्या खिश्यातुन बाहेर काढुन सदर लाच रक्कम फाईलमध्ये ठेवु का? असे विचारले असता सैंदाणे यांनी होकार दिला. तेव्हा मी सदर लाच रक्कम त्यांच्या हातात असलेल्या फाईलमध्ये ठेवुन दिली. त्यानंतर सदरची फाईल सैंदाणे यांनी त्यांचे कपाटात ठेवुन दिली. त्यानंतर सैंदाणे हे चहा पिण्यास कार्यालयाच्या बाहेर निघुन गेले.त्यानंतर मी त्यांच्या मागोमाग गेलो व सापळा पथकाने ठरवुन दिल्या प्रमाणे मी सापळा पथकास इशारा केला. तेव्हा बच्छाव साहेब व सापळा पथक यांनी सैंदाणे यांना पकडले. तेव्हा बच्छाव साहेब यांचे सुचने नुसार माझे जवळील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर बाहेर काढुन ते बंद केले. त्यानंतर बच्छाव साहेब यांनी सैंदाणे यांना त्यांची व सापळा पथकाची ओळख सांगितली. त्यानंतर बच्छाव साहेब यांनी सैंदाणे यांना त्यांचे पुर्ण नाव, गांव व पत्ता

एस.के.बच्छाव
PI.ACB जळगांव

P. Bhujawanshi

विचारला असता त्यांनी त्यांचे नाव तुळशिराम भगवान सैंदाणे, वय ३४, व्यवसाय कंत्राटी कर्मचारी समाविशीत शिक्षण तज्ञ, गट साधन केंद्र, पंचायत समीती धरणगांव रा.प्लॉट नं.४,बोरोळे नगर जवळ, पंडीत कॉलनी मुकबधिर शाळेजवळ चोपडा ता.चोपडा जि.जळगांव असे सांगितले.त्यानंतर बच्छाव साहेब यांनी सैंदाणे यांना लाचेच्या रकमेबाबत विचारणा केली असता त्यांनी सदर लाचेची रक्कम कार्यालयातील कपाटामध्ये ठेवलेल्या एका गुलाबी रंगाच्या फाईलमध्ये असल्याचे सांगितले. त्यानंतर बच्छाव साहेब,सापळा पथक व पंच असे सदर ठिकाणाहुन पायी निघुन कार्यालयात गेलो. तेव्हा सैंदाणे यांनी एका लोखंडी पत्री कपाटातुन एक गुलाबी रंगाची फाईल बाहेर काढुन सदर फाईलमध्ये ठेवलेली २०००/—रुपये (त्यात ५००/— रुपये दराच्या ०४ नोटा) लाच रक्कम दोन्ही पंचासमक्ष काढुन दिली. त्यानंतर सापळा पथकाने सैंदाणे यांना ताब्यात घेतले.

त्यानंतर बच्छाव साहेब यांनी गट शिक्षणाधिकारी अशोक बि—हाडे यांना पंचायत समिती कार्यालय,धरणगांव येथुन ताब्यात घेतले. तेव्हा बच्छाव साहेब यांनी गट शिक्षणाधिकारी अशोक बि—हाडे यांना त्यांची व सापळा पथकाची ओळख सांगितली. त्यानंतर बच्छाव साहेब यांनी गट शिक्षणाधिकारी अशोक बि—हाडे यांना त्यांचे पुर्ण नाव, गांव व पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव अशोक दामु बि—हाडे, वय ५६, व्यवसाय नोकरी, प्रभारी गट शिक्षणाधिकारी, पंचायत समीती धरणगांव रा.प्लॉट नं.३०, राधाकृष्ण नगर,एल.आय.सी कॉलनी जवळ, पिंपळे रोड अमळनेर ता.अमळनेर जि.जळगांव असे सांगितले.

त्यानंतर पुढील कारवाई ॲन्टी करप्शन ब्युरो जळगांव कार्यालय येथे जावुन करण्यात आली. सदर कार्यालयातील एका रुममध्ये आरोपी सैंदाणे, माझ्या व दोन्ही पंचाच्या हातांची अल्ट्राव्हायलेट बॅटरीच्या प्रकाशात तपासणी केली. त्यानंतर पुढील उर्वरीत सापळा कारवाई केली आहे. तसा पंचनामा केला आहे.

अशा प्रकारे आरोपी क्रं. १ अशोक दामु बि—हाडे, प्रभारी गट शिक्षणाधिकारी, पंचायत समीती धरणगांव यांनी दि.३०.१२.२०२१ रोजी पंचासमक्ष आमच्या शाळेचे प्रतीपुर्ती अनुदान मंजुर होण्यासाठीचे प्रस्तावावर अनुकुल अहवाल सादर करण्याच्या मोबदल्यात २०००/—रु. लाच मागणी केली. तसेच दि.२४.०१.२०२२ रोजी मला आरोपी क्रं. १ यांनी सदर लाच रक्कम आरोपी क्रं.२ तुळशिराम सैंदाणे यांचेकडेस देण्यास सांगितली.

तसेच आरोपी क्र.२ तुळशिराम भगवान सैंदाणे, कंत्राटी कर्मचारी, गट साधन केंद्र, पंचायत समीती धरणगांव यांनी आरोपी क्रं.१ अशोक बि—हाडे यांचे सांगणेवरुन माझेकडून दि.२४.०१.२०२२ रोजी १५.४३ वा गट शिक्षणाधिकारी कार्यालय,धरणगांव येथे २०००/—रु.लाच रक्कम स्वतः स्विकारली. म्हणुन माझी आरोपी क्रं. १ अशोक दामु बि—हाडे,प्रभारी गट शिक्षणाधिकारी व आरोपी क्रं. २ तुळशिराम भगवान सैंदाणे, कंत्राटी कर्मचारी यांचे विरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरील नमुद संगणकावर मराठी भाषेत टंकलीखीत केलेली फिर्याद मला वाचुन दाखविली ती मला समजली सदरची फिर्याद माझे सांगणे प्रमाणे बरोबर व खरी आहे.

**समक्ष**

**फिर्यादीची सही**

P. B. Suryawanshi.
(प्रशांत भ. सुर्यवंशी)

**एस.के.बच्छाव**
**पोलीस निरिक्षक**
**ॲन्टी करप्शन ब्युरो,जळगांव**